# देवाची प्रेमळ कृपा

**प्रार्थना:** "आमच्या स्वर्गातील पित्या, मुलांना तुझी प्रेमळ कृपा समजावी आणि त्याबद्दल प्रशंसा करावी यासाठी ह्या अभ्यासाचा कृपा करून उपयोग करून घे."

मुलांची पार्श्वभूमी आणि स्थानिक रीती ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

## 1. उधळ्या पुत्राचा कथा वृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा लूक 15:11-32




शक्य असल्यास एका मोठ्या मुलाला इतर मुलांना कथा वृत्तांत सांगण्यासाठी तयार करा.

हा कथा वृत्तांत सांगण्यापूर्वी त्याचा हेतू स्पष्ट करा. एका तरुण मुलाला त्याच्या वडिलांनी क्षमा केली तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्का बसला, हे यातून दिसते. हा मुलगा आपल्या वडिलांशी अतिशय वाईटपणे वागला होता.

कथा वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा:

- मुलाने आपल्या वडिलांकडे कशाची मागणी केली?
- मुलाने आपला हिस्सा घेऊन काय केले?
- मुलाने त्याच्या हिश्याचे सर्व पैसे उधळून टाकल्यावर काय झाले?
- मुलाने आपल्या वडिलांना काय सांगायचे होते?
- वडील मुलाशी कसे वागले? मोठ्या भावाला आपल्या लहान भावाविषयी काय वाटले?



- वडिलांनी मोठ्या भावाची समजूत कशी घातली?
- उधळ्या पुत्र राखत असलेल्या डुकरांचे चित्र काढा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांना चित्र काढण्यास मदत करावी.

- प्रौढांना स्पष्ट करून सांगा. आपण देवापासून कितीही दूर गेलो तरी देवाची कृपा आपल्यापर्यंत कशी पोहंचते हे डुकरांवरून दिसते. आम्ही कितीही घोर पाप केले असेल; पण आम्ही आमचे पातक सोडून त्याच्याकडे वळतो आणि त्याच्याकडे क्षमा मागतो तेव्हा तो आमची क्षमा करतो.

**2. 'उधळ्या पुत्र' ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा. त्याच्या तालमी करून ते प्रौढांसमोर सादर करा.**

- मुलांना ही नाटिका प्रौढांसमोर सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- निवेदक वृत्तांताचे वाचून दाखवीत असताना अभिनय करणाऱ्यांनी पवित्र शास्त्रातील कथा वृत्तांतातील त्या त्या भूमिकांचे संवाद म्हणून अभिनय करावा.
- ह्या कथा वृत्तांताविषयी मुलांनी प्रश्न तयार करावेत आणि नाटिका संपल्यावर ते प्रौढांना विचारावेत.
- प्रत्येकाचे संवाद व कृती नीट समेजपर्यंत तालमी करा.

**निवेदकः** जे संवाद मुले बोलणार नाहीत ते वाचून दाखवा आणि मग मुलांना अभिनय करता यावा यासाठी थोडे थांबा.

**उधळ्या पुत्रः** धाकट्या मुलाचे संवाद म्हणा नेमके काय घडले हे स्पष्ट करणारा अभिनय किंवा शब्द ह्यांची भर घाला.

**वडीलः** वडिलांचे संवाद म्हणून त्यानुसार अभिनय करा.

**मोठा मुलगाः** मोठ्या मुलाचे संवाद म्हणून त्यानुसार अभिनय करा.

**सेवकः** सेवकाचे संवाद म्हणून त्यानुसार अभिनय करा. यात एक पुष्ट वासरू घेऊन ते कापण्याचाही अभिनय करा.

**वासरूः** नाटिकेत थोडी गंमत करायची असेल तर दोन मुलांना वासराची भूमिका करण्यास सांगा. त्यांना एकमेकाच्या मागे ओणवे उभे करून त्यांच्या अंगावर एक सतरंजी टाका.

**मोठा मुलगाः** मोठ्या मुलाचे संवाद म्हणून त्यानुसार अभिनय करा.

**वाईट मित्रः** मुलांची संख्या पुरेशी असेल तर काही मुलांना वाईट मित्रांचा अभिनय करण्यास सांगा. मित्र उधळ्या पुत्राला पैसे उडवण्यास मदत करतातः



3. **कविता ( स्तोत्र 103, वचने 2,3,4 व 13 )**

- दोन मुलांना दोन भाग म्हणायला सांगा.
- त्यांना ही कविता प्रौढांसाठी म्हणता येईल.

**भाग 1**

हे माझ्या जिवा परमेश्वरचा धन्यवाद कर,
त्याचे सर्व उपकार विसरू नको;
तो तुझ्या सर्व दुष्कर्मांची क्षमा करितो,
तो तुझे सर्व रोग बरे करितो.

**भाग 2**

तो तुझा जीव विनाशगर्तेतून उद्धरितो,
तो तुला दया व करुणा ह्यांचा मुकुट घालितो,
जसा बाप आपल्या मुलांवर ममता करितो,
तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यावर ममता करितो.

4. **पाठांतरासाठी वचन:** इफिस 2:8-9

5. **प्रार्थना:**

"प्रभु आमचे जीवन पापाने भरलेले आहे आणि तू नसशील तर आम्ही हरवून जाऊ."
"आमच्या वाईट गोष्टीबद्दल आम्हांला क्षमा केलीस याबद्दल धन्यवाद."
"आम्ही तुझ्याकडे पाठ फिरविली तरी तू परत आमचे स्वागत केलेस म्हणून तुझे आभार मानतो."
"आम्ही तुझ्याकडे परत येतो तेव्हा तुला हर्ष होतो यात आम्हांला आनंद आहे."
"हरविलेले लोक तुझ्याकडे परत येतात त्यावेळी आनंद करण्यास आमचे साहाय्य कर.
"येशूच्या पवित्र नावात हे मागितले आहे, आमेन."

Download Paul-Timothy studies freely from www.Paul-Timothy.net